AC – 20.04.2024
Item No. – 5.4 (N) Sem II (1c)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| Syllabus for<br>Basket of OE | |
|---|---|
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **II** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **नाटक एक प्रयोगजीवी कला ३ (रंगमंच, नेपथ्य आणि अभिनय यांचा अभ्यास)** | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | Description the course :<br><br>Including but Not limited to : | **नाटक एक प्रयोगजीवी कला ३ (रंगमंच, नेपथ्य आणि अभिनय यांचा अभ्यास)**<br>प्रथम वर्ष बी.ए. मराठी OPEN ELECTIVE या विषयासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दुसऱ्या सत्रात **नाटक एक प्रयोगजीवी कला ३ या अंतर्गत ' रंगमंच, नेपथ्य आणि अभिनय'** ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास हे उद्दिष्ट समोर ठेऊन योजलेल्या या अभ्यास पत्रिकेद्वारे नाटक या प्रयोगजीवी कलेचे **रंगमंच, नेपथ्य आणि अभिनय** हे घटक विस्ताराने परिचित करून देणे, येथे अभिप्रेत आहे. सदर अभ्यासक्रम दोन श्रेयांकनांसाठी योजला आहे.<br>नाटकाचे सादरीकरण रंगमंचावर होते. हा रंगमंच पडदा असणारा, पडदा नसणारा, तीन बाजूने मोकळा असणारा किवा खुला रंगमंच इ. असा विविध प्रकारचा असू शकतो. जिथे नाटकाचे मंचन घडते तो रंगमंच बनतो. नाटकाच्या आवश्यकतेनुसार रंगमंचाची विभागणी केली जाते. त्यानुसार नेपथ्यरचना, पात्रांची स्थान निश्चिती होत असते. नाटकाच्या आशयानुसार रंगमंच आणि नेपथ्याची निवड व रचना अवलंबून असते. नाटक नेपथ्याच्या आधारे निश्चित केलेल्या भिन्न-भिन्न अवकाशात घडत असते. नाट्यवस्तूला रसिकमनात प्रथम दर्शनी प्रस्थापित करण्याचे कार्य नेपथ्य करते. नाट्यार्थ सखोलपणे जाणून घेण्याच्या प्रक्रियेत नेपथ्याच्या योजनेचे विश्लेषण करणे हे अनिवार्य ठरते. म्हणून नाटकाच्या प्रयोगाच्या या घटकाचा सूक्ष्म अभ्यास कलाआस्वादक व कलावंत म्हणून विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यांची जडणघडण करणारा आहे.<br>या अभ्यासक्रमातील दुसरा घटक अभिनय हा आहे. भारतीय रंगभूमी ही प्राचीन रंगभूमी असून नाट्यशास्त्र अभ्यासाच्या दीर्घ परंपरेत अभिनयाच्या स्वरूपाचा बारकाईने विचार झालेला आहे.तसाच तो पाश्चात्य विचारांतही आहे. त्यादृष्टीने अभिनयाचे प्रकार, अभिनयाच्या पद्धती यांच्या अभ्यासाद्वारे अभिनय कलेची ओळख विद्यार्थ्यांना येथे करून द्यायची आहे. त्यामुळे नाटकाच्या प्रयोगासाठी रंगमंच,नेपथ्य, अभिनय हे गाभ्याचे घटक असतात आणि ते परस्परांशी संबंधित असतात यांचे भान विकसित करणे, नाट्यास्वादाची क्षमता वृद्धिंगत करणे, अभिनय, नेपथ्यरचना, दिग्दर्शन या कलांविषयी आवड निर्माण करणे आणि भविष्यातील संधी म्हणून कौशल्यविकासाच्या दिशा दर्शवणे या प्रमुख उद्देशांनी प्रथम वर्षाच्या दुसऱ्या सत्रात मराठी विषयाच्या OPEN ELECTIVE या स्तंभाखाली **'रंगमंच, नेपथ्य आणि अभिनय ' ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे.** या अभ्यासपत्रिकेअंतर्गत **रंगमंच, नेपथ्य** आणि **अभिनय** हे दोन भाग केले असून प्रत्येकी एक श्रेयांकन नेमून |

| | | |
|---|---|---|
| | | सदर अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आलेली आहे.<br>सदर अभ्यासक्रम नाट्यसृष्टीशी जोडणारा आहे. |
| **2** | **Vertical :** | Open Elective |
| **3** | **Type :** | Theory |
| **4** | **Credit**: | 2 credits ( 1 credit = 15 Hours for Theory) |
| **5** | **Hours Allotted :** | 30 Hours |
| **6** | **Marks Allotted**: | 50 Marks |
| **7** | **Course Objectives**:<br>१.नाटकाच्या प्रयोगाशी संबंधित रंगमंच व नेपथ्य या घटकांचे स्वरूप व परस्परसंबंध स्पष्ट करणे.<br>२. अभिनय या घटकाचे स्वरूप,प्रकार व अन्य घटकांशी असणारे संबंध स्पष्ट करणे.<br>३.नेपथ्यरचना, अभिनय या कलांविषयी कुतुहल जागृत करणे.<br>४.रंगमंच, नेपथ्य आणि अभिनय यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमागील दिग्दर्शकीय मूल्यदृष्टीविषयीचे भान विकसित करणे.<br>५.नाट्यास्वादाची समज वृद्धिंगत करणे. | |
| **8** | **Course Outcomes**:<br>१.नाटकाच्या प्रयोगाशी संबंधित रंगमंच व नेपथ्य या घटकांचे स्वरूप व परस्परसंबंध स्पष्ट होतील.<br>२. अभिनय या घटकाचे स्वरूप,प्रकार व अन्य घटकांशी असणारे संबंध स्पष्ट होतील.<br>३.नेपथ्यरचना, अभिनय या कलांविषयी कुतुहल जागृत होईल.<br>४.रंगमंच, नेपथ्य आणि अभिनय यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमागील दिग्दर्शकीय मूल्यदृष्टीविषयीचे भान विकसित होईल.<br>५.नाट्यास्वादाची समज वृद्धिंगत होईल. | |

| | |
|---|---|
| **9** | **Modules**:- |
| | **Module 1: घटक एक :रंगमंच व नेपथ्य** |
| | १. रंगमंच – संकल्पना व स्वरूपविशेष यांचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय.<br>२. नेपथ्य – संकल्पना व स्वरूपविशेष यांचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय<br>३. रंगमंच आणि नेपथ्यरचना यांचा परस्परसंबंध- विविध उदाहरणे.<br>**(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका -श्रेयांकन -१** |
| | **Module 2**: **घटक दोन : अभिनय** |
| | १. अभिनय- संकल्पना, स्वरूपविशेष आणि प्रकार यांचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय.<br>२. अभिनयाच्या पद्धतींचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय.<br>३. अभिनयास पूरक कौशल्यांचा परिचय. उदा: आवाजातील चढ उतार, मुद्रा परिचय, शारीरिक हालचाली इ<br>**(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका -श्रेयांकन -१ )** |
| **10** | **Text Books:**<br>**NA** |
| **11** | **संदर्भसूची** :<br>१. अभिनय साधना-के.ना.काळे (मूळ ग्रंथ-An actor prepares -Stanislavski)<br>२. भूमिकाशिल्प -के.ना.काळे (मूळ ग्रंथ -Building a Character- Stanislavski)<br>३. भारतीय साहित्यशास्त्र - ग.त्र्यं देशपांडे<br>४. वाचिक अभिनय- श्रीराम लागू, राजहंस प्रकाशन.<br>५. माझा नाट्य लेखन- दिग्दर्शनाचा प्रवास – डॉ.वि.भा. देशपांडे, उन्मेष प्रकाशन , पुणे, १९८८<br>६. झिम्मा -आठवणींचा गोफ -विजया मेहता, राजहंस प्रकाशन, पुणे.<br>७. नाटकवाल्याचे प्रयोग – अतुल पेठे, मनोविकास प्रकाशन.<br>८. नाट्यनिर्मिती प्रक्रिया -दलपतसिंग येती गावा, संपादक-विनोद शिरसाठ, साधना प्रकाशन, पुणे.<br>९. लागलेली नाटकं -राजीक नाईक, शब्द प्रकाशन, मुंबई.<br>१०. मराठी नाटक आणि रंगभूमी -वसंत आबाजी डहाके ,पॉप्युलर प्रकाशन, २०१८, मुंबई.<br>११. निवडक निबंध १ रंगभूमी आणि साहित्य -मकरंद साठे, मनोविकास प्रकाशन, २०१८.<br>१२. के. ना. काळे यांच्या लेखांचे संपादन (प्रतिमा, रूप आणि रंग), संपा. डॉ.वि.भा. देशपांडे, नूतन प्रकाशन, पुणे<br>१३. मराठी नाटक आणि रंगभूमी (भाग १ व २)- वि.भा.देशपांडे<br>१४. दशावतार – महेश केळूसकर , अनघा प्रकाशन. ठाणे. २०१९ |

| | | |
|---|---|---|
| | १५. ललित मासिक -नाट्य विशेषांक<br>१६. रंग नाटकाचे- पुष्पा भावे<br>१७. Drama: Text into Performer – Peter Reynolds<br>१८. प्रवीण भोळे यांच्या ब्लॉग वरील लेख रंगण (pradabho.blogspot.com)<br>१९. रंगमंच : रंगमंच – मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती (marathi.gov.in) | |
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| **13** | **Continuous Evaluation through:**<br>Quizzes, Class Tests, presentation, project, role play, creative writing, assignment etc.( at least 3 ) | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा-लेखी/ऑनलाईन ,गृहपाठ , सादरीकरण - २० गुण |
| **14** | **Format of Question Paper:** for the final examination<br><br>बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br><br>प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br><br>तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित दहा गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. | |

Sign of the BOS Chairman

Name of the Chairman: **Prof. Satish Kamat**

Name of the BOS: **Marathi**

Sign of the Offg. Associate Dean

Name of the Associate Dean: **Prin. Dr. Suchitra Naik**

Name of the Faculty: **Humanities**

Sign of the Offg. Dean

Name of the Offg. Dean: **Prin. Dr. Anil Singh**

Name of the Faculty**:** **Humanities**